“ दीनदयाळ नागरी सहकारी बँक मर्या. अंबाजोगाई चे : आर्थिक विश्लेषण - 1997 ते 2017 ”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्यविद्या शाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी.पदवीच्या संशोधनाचा सारांश

आराखडा

✧ संशोधक ✧

श्री. जोशी गोविंद दिगांबरराव

एम.ए.एम.फिल. (अर्थशास्त्र)

✧ मार्गदर्शक ✧

प्रा.डॉ. मनोजकुमार सोमवंशी

एम.ए.बी.एड्., बी.पी.एड., पीएच.डी.

अर्थशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक

शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ 413544 जि.लातूर

✧ संशोधन केंद्र ✧

सामाजिक शास्त्रे, संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जून 2019

“ दीनदयाळ नागरी सहकारी बँक मर्या. अंबाजोगाई चे : आर्थिक विश्लेषण - 1997 ते 2017 ”

प्रस्तावना (Introduction):

आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये बँकेचे वेगळे महत्त्व सांगण्याची गरज नाही. कोणत्याही देशाची आर्थिक परिस्थिती सुधारणेमध्ये बँकेच्या कामगिरीचा फार मोठा वाटा असतो. एखाद्या देशाची आर्थिक परिस्थिती कशी आहे हे जाणून घ्यावयाचे असेल तर त्या देशातील बँकेचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. ज्या देशातील बँका समृध्द असतील तो देश समृध्द समजावा. बँक व्यवसाय म्हणजे पैशाच्या देवाणघेवाणीचा व्यवसाय होय. आजपासून जवळ-जवळ 4000 वर्षापूर्वी या व्यवसायाची सुरुवात झाली. हा व्यवसाय व्याख्येवरुन समजतो.

‘‘लोकांकडून ठेवीच्या स्वरुपात गुंतवणुकीसाठी अथवा कर्ज म्हणून देण्याच्या हेतूने पैसे स्वीकारणारी व त्या रकमा ठेवीदारांना मागणी करताच किंवा मुदत संपताच धनादेशाद्वारे परत करणारी संस्था संस्था म्हणजे बँक होय.’’

आपल्या प्राचीन ग्रंथात मानवी जीवन सुखमय करण्यासाठी अर्थाची महत्ती गायली गेली आहे. संत तुकाराम महाराजांनी सहकाराचे महत्त्व ‘एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ।’ या रचनेतून व्यक्त केले आहे. खऱ्या अर्थाने सहकारी चळवळ ही एक अशी पध्दती आहे की, यात समता, बंधुता, सामाजिक न्याय व स्वावलंबन इत्यादी गोष्टी अभिप्रेत असतात. या पध्दतीत भांडवल हे मालकाची भूमिका पार पाडत नसते. तर भांडवल हे सेवकाची भूमिका बजावते. खऱ्या अर्थाने अल्प व मध्यम वर्गीयांना त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि स्थानिक बचत जमा करण्यासाठी नागरी सहकारी बँका अस्तित्वात आल्या. सद्याच्या काळात अशा बँकेची प्रगती मोठया प्रमाणावर होत आहे. मध्यम वर्गीयांना मध्यम, लहान व अल्प मुदती कर्जाची गरज भासत आहे. ती नागरी सहकारी बँका पूर्ण करीत आहेत.

सन 1915 मध्ये मॅकलेगन समितीने दाखवून दिले होते की, शहरी भागातील पतपेढया या उच्च व मध्यम वर्गीयांना बँकेची सर्वसामान्य तत्व समजण्यास उपयुक्त आहेत. सन 1931 मध्ये केंद्रीय बँकींग ची अशी समितीने शिफारस केली होती की, सहकारी संस्थांची मर्यादा, देयता ही नागरी सहकारी बँक असते आणि ती अशा ठिकाणी स्थापन

करावी की, जेथे आवश्यक सुविधा व परिस्थिती असेल आणि तिचा उद्देश मध्यम वर्गीय लोकांचा फायदा असा असावा. अशा संस्था सभासदाकडून ठेवी जमा करुन त्यांची गुंतवणूक करीत असतील तर अशा नागरी सहकारी बँकांची कर्तव्य असेल की, त्यांनी लहान व्यापारी छोटे, दुकानदार व मध्यम वर्गीयांना मदत करावी.

भारतात नागरी सहकारी पतचळवळ सुरु करण्यामागचा मुख्य उद्देश म्हणजे शहरी भागातील लहान व्यापारी, व्यवसायिक, कारागीर, कामगार, मध्यम वर्ग व पगारदार वर्ग इत्यादींना कर्ज उपलब्ध करुन देणे, त्याचबरोबर सराफी पेढीवाले सावकारांच्या कचाटयातून मध्यम वर्ग व अल्प उत्पन्न असणाऱ्यांची सुटका करणे व त्यांना संरक्षण देणे व लोकांना बचतीची सवय लावणे.

ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणा कमी करण्यासाठी सरकारने कृषी पतपुरवठा संस्थांना मोठया प्रमाणात मदत केली परंतु सरकारने नागरी सहकारी बँकांना अशा प्रकारचे सहाय्य केले नाही. म्हणून नागरी सहकारी बँकांना स्वतःच्याच हिंमतीवर उत्कर्ष करणे अपेक्षित बनले होते. अशा परिस्थितीमुळे नागरी बँकांपुढे मोठे आव्हान उभे राहिले. त्याचबरोबर स्वतःच्या पायावर उभे राहण्याची व स्वावलंबी बनण्याची एक संधी ही मिळाली. सरकारच्या कमी हस्तक्षेपामुळे या बँकांना स्वतःचे नेतृत्व विकसीत करता आले आणि व्यवस्थापकीय कार्यक्षमता ही सिध्द करता आली. त्यामुळे विविध शहरांमधून बँकांची स्थापना झाली व संबंधित बँकाच्या शाखांचा विस्तार मोठया प्रमाणावर झाला. त्याचप्रमाणे बीड जिल्हयातील अंबाजोगाई शहरामध्ये सन 1997 मध्ये दीनदयाळ नागरी सहकारी बँकेची स्थापना झाली. जवळपास त्यांच्या शाखांचा विस्तार मुख्य शाखेसह 16 एवढा झाला. प्रस्तुत संशोधन अध्ययनात संशोधकाने घेतलेला “ दीनदयाळ नागरी सहकारी बँक मर्या. अंबाजोगाई चे : आर्थिक विश्लेषण - 1997 ते 2017 ” असा विषय घेतला असून प्रस्तुत संशोधनात संशोधकाने बँकेची उद्दिष्ट्ये, प्रगती, कार्ये, वित्तीय योजना, शाखा विस्तार, उत्पन्न, खर्चाचा आढावा, नवीन आर्थिक धोरणांचा परिणाम, सरकारची नागरी सहकारी बँकेविषयीची धोरणे अशा अनेक बाबींचा अभ्यास स्वतंत्रपणे (संशोधनात्मक) करणाण्यात येणार आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये (Objectives of Study) :

संशोधन समस्येचे अध्ययन करीत असताना समस्येच्या अनेक पैलुंचा अभ्यास करावा लागतो. परंतु त्यामुळे योग्य दिशा आणि गती मिळू शकत नाही. म्हणून संशोधनाची उद्दिष्ट्ये निर्धारीत करुन त्यावर संपूर्ण लक्ष केंद्रीत करुन उद्दिष्ट्ये निर्धारीत करण्यात आलेली आहेत.

1) बँकेच्या वित्तीय प्रबंधन व आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.
2) बँकेने राबविलेल्या विविध योजनांचा अभ्यास करणे.
3) बँकेच्या कर्जपुरवठा व वसुली धोरण पद्धतीचे अध्ययन करणे.
4) बँकेच्या ठेवी व व्याजदर यांचा अभ्यास करणे.
5) नवीन आर्थिक धोरण व माहिती तंत्रज्ञानातील बदलांचा बँकेच्या कामगिरीवरील परिणाम अभ्यासणे.
6) बँकेच्या स्थापनेपासून वाटचालीचा आढावा घेणे.

संशोधनाची गृहीतके (Hypothesis of Study):

संशोधकाने अध्ययनाचे उद्देश लक्षात घेवून संशोधनास योग्य दिशा देण्याकरीता खालील गृहीतके मांडलेली आहेत ते संशोधनाची फलयुक्त आधार आहेत.

1) दीनदयाळ नागरी सहकारी बँकेची प्रगती योग्य दिशेने होत आहे.
2) दीनदयाळ नागरी सहकारी बँक सभासदाचे हीत जोपासते.
3) दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे प्रशासन, संचालक मंडळ योग्य पध्दतीचे कार्य करते.
4) दीनदयाळ नागरी सहकारी बँकेतील कर्मचारी प्रबंधन व कार्यालयीन प्रबंधन योग्य रितीने कार्य करते.
5) दीनदयाळ नागरी सहकारी बँकेत सभासद व सामान्य खातेदार यांना कर्जपुरवठा आणि सेवा योग्य पध्दतीने पुरविल्या जातात.

संशोधनाचे महत्त्व (Importance of Research):

बीड जिल्हयात असलेल्या सर्व नागरी सहकारी बँकापैकी दीनदयाळ नागरी सहकारी बँक चांगल्या पद्धतीने कार्य करीत आहे. बीड जिल्हा औद्योगिकदृष्टया मागासलेला आहे आणि इतर जिल्हयांच्या तुलनेत बीड जिल्हयामध्ये पावसाचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे बीड जिल्हयात स्थापन झालेल्या बँका कशा पध्दतीने कार्य करीत आहेत यासाठी बीड जिल्हयातील दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचा अभ्यास करणे संयुक्तिक वाटले.

नागरी सहकारी बँकेच्या माध्यमातून येथील लोकांचा आर्थिक स्तर उंचावण्याचे कार्य केले आहे. जिल्हयातील इतर सहकारी घटकांचा ज्या पध्दतीने लोकांवर परिणाम झाला आहे

त्यात नागरी सहकारी बँकांचा किती प्रभाव आहे हे देखील कार्य करीत आहेत पण त्यांच्या तुलनेत नागरी सहकारी बँकांनी आपले स्वतंत्र अस्तित्व कशा पद्धतीने टिकवून ठेवलेले आहे हे समजून घेणे गरजेचे वाटते.

संशोधन साहित्याचा आढावा (Review of Literature):

ज्ञानाच्या कोणत्याही शाखेत नवीन तथ्याच्या शोधासाठी काळजीपूर्वक केलेले अन्वेषण किंवा परिक्षण म्हणजे संशोधन होय. संशोधकाने निवडलेल्या विषयक्षेत्राशी संबंध्ति साहित्याचे वाचन व मनन हा अन्वेशनात्मक अध्ययनातील एक महत्त्वाचा भाग आहे. यानुसारच " दीनदयाळ नागरी सहकारी बँक मर्या. अंबाजोगाई चे : आर्थिक विश्लेषण - 1997 ते 2017 "या विषयाचे संशोधन करीत असताना काही निवडक संशोधन साहित्याचा परामर्श घेण्यात येणार आहे. यामध्ये सहकारी कायदे, समित्या, बँका व पतसंस्था यावर आधारीत झालेल्या संशोधनाचा संबंधित शोध प्रबंधात आढावा घेण्यात येईल.

समस्या सुत्रण (Problems and Solutions):

सदरील " दीनदयाळ नागरी सहकारी बँक मर्या. अंबाजोगाई चे : आर्थिक विश्लेषण - 1997 ते 2017 " या संशोधनामध्ये सदरील बँक ही किती प्रमाणात कर्जपुरवठा करते?, या बँकेच्या नफ्याचे प्रमाण किती आहे?, ही बँक सभासदांचे हीत जोपासते का? संचालक मंडळ योग्य भूमिका पार पाडते का? कर्मचारी योग्य प्रमाणात कार्य करतात का? नवीन आधुनिक संकल्पनांचा वापर केला जातो का? बँकेच्या शांखांच्या प्रमाणात वाढ झाली आहे का? खातेदारांना योग्य वेळी सेवा पुरविल्या जातात का? अशा अनेक समस्यांचे निराकरण सदरील शोध प्रबंधातून करण्यात येणार आहे.

संशोधन पद्धती (Research Methodology):

प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीवर आधारीत आहे.

प्राथमिक साधन सामग्री :-

प्राथमिक साधन सामग्री मध्ये या बँकेच्या प्रबंधकाची, संचालकाची / अध्यक्षाची व खातेधारकाची मुलाखत घेतली जाणार आहे व त्यांच्याकडून आवश्यक ती माहिती मुलाखतीद्वारे व प्रश्नावली द्वारे संकलीत केली जाणार आहे.

दुय्यम साधन सामग्री:-

द्वितीयक साधन सामग्रीमध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेचे विविध अहवाल नागरी सहकारी बँक फेडरेशन व असोशिएशन यांचे अहवाल, दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे विविध अहवाल, नाबार्ड बँकेचे अहवाल, सहकार आयुक्त यांचे वार्षिक अहवाल, जिल्हा सामाजिक

व आर्थिके समालोचन यांचे वार्षिक अहवाल, विविध प्रकारची पुस्तके, नियतकालिके, वृत्तपत्रे यामध्ये प्रकाशित झालेल्या माहितीचा उपयोग करण्यात येणार आहे.

सांख्यिकीय माहितीः-

प्रस्तुत संशोधनासाठी माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. या माहितीसाठी सरासरी सहसंबंध, निर्देशांक, मुल्यमापण या पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. तसेच चित्रे व आलेखांचा देखील वापर करण्यात येणार आहे.

नमूना निवड (Sampling Method):

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकांने '' दीनदयाळ नागरी सहकारी बँक, अंबेजोगाई चे : आर्थिक विश्लेषण - 1997 ते 2017 '' या संशोधनात नमूना निवडीच्या सहेतूक नमूना निवड पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

अनुभववादी औपचारीक व अनौपचारीक साहित्याच्या उपलब्धीनूसार वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब प्रस्तुत संशोधनासाठी करण्यात येणार आहे.

संशोधनाचा कालावधी (Period of Study):

प्रस्तुत संशोधन हे दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या स्थापनेपासून म्हणजेच 1997 पासून 2017 पर्यंत करण्यात येणार आहे. म्हणजेच जवळ-जवळ 20 वर्षे एवढा कालावधी घेतला आहे.

संशोधनाची व्याप्ती (Scope of Study) :

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही दीनदयाळ नागरी सहकारी बँक लि.अंबाजोगाई जि.बीड च्या सर्व शाखांसाठी व्यापक स्वरुपात संपूर्ण मूल्यमापन व तिच्या सर्व शाखांचे मूल्यमापनात्मक अभ्यासासाठी सन 1997 ते 2017 असा कालावधी निवडण्यात आला आहे.

संशोधनाची साधने (Tools of Research):

प्रस्तुत संशोधनासंबंधी माहिती मिळविण्यासाठी खालील साधनांचा वापर केला जाणार आहे. यामध्ये सर्वेक्षण डायरी, सरकारचे विविध अहवाल, बँकेचे अहवाल, नमुना प्रश्नावली, भेटी देण्यासाठी वाहन, फोन, मोबाईल, पोस्ट, गणकयंत्र, झेरॉक्स, फोटोग्राफी अशा अनेक साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधनाच्या मर्यादा (Limitations of Study):

प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीवर आधारलेले आहे. योग्य व विश्वसनीय आकडेवारीचा अभाव, विविध पद्धतीने जमा केलेली शासकीय व निमशासकीय आकडेवारी त्याची गोपनियता व अपूर्ण माहितीमुळे साधन सामग्रीवर मर्यादा पडतील. काही ठेवीदार व कर्जदार तसेच कर्मचारी अचूक माहिती देण्यास नकार देतील. त्यामुळे माहितीचा अपुरेपणा ही या संबंधीची मर्यादा राहील.

प्रकरण विभागणी:

“ दीनदयाळ नागरी सहकारी बँक मर्या. अंबाजोगाई चे : आर्थिक विश्लेषण - 1997 ते 2017 ”या संशोधन विषयासाठी खालीलप्रमाणे प्रकारणांची विभागणी करण्यात येणार आहे.

1) **प्रास्ताविक**
2) **संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन**
3) **बीड जिल्हयातील नागरी सहकारी बँक, अधिकोष व्यवस्था**
4) **दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या ठेवींचा अभ्यास**
5) **दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या कर्जपुरवठयाचा अभ्यास**
6) **दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे गुंतवणूक, नफा, थकबाकी, निष्क्रीय मालमत्तेचे अध्ययन**
7) **निष्कर्ष व शिफारशी**

संदर्भसूची (References):

1) प्रदीप आगलावे (2008) : सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे, साईनाथ प्रकाशन, नागपूर.
2) डॉ. एस.के.ढगे, डॉ.बी.जी.लोबो, प्रा.टी.डी.फर्नांडीस : भारतीय बँक प्रणाली, के.एस. पब्लिकेशन, पुणे.
3) डॉ. सुधीर बोधनकर (2009) : बँक व वित्तीय प्रणाली, कैलाश प्रकाशन, औरंगाबाद.
4) व्ही.यु.बडे : सहकार , नांदेड प्रकाशन, पुणे 2.
5) डॉ. जितेंद्र अहिरराव : 'पैसा व वित्त' संजय प्रकाशन पुणे.
6) डॉ. मुकुंद महाजन : 'बँकींग' निराली प्रकाशन, पुणे.
7) भारतीय अर्थव्यवस्था : दत्त एवं सुंदरम, एस. चाँद प्रकाशन नवी दिल्ली 2012
8) भारत 2016, प्रकाशन विभाग, सुचना और प्रकाशन मंत्रालय, भारत सरकार.
9) भारतीय अर्थव्यवस्था : कै. देसाईकर व डॉ. सौ. निर्मला भालेराव निराली प्रकाशन पुणे – जुलै 2015.
10) प्रतियोगीता दर्पन : भारतीय अर्थव्यवस्था, उपकार प्रकाशन दिल्ली.

: संशोधक:

श्री जोशी गोविंद दिगांबरराव

एम.ए.,एम.फिल.(अर्थशास्त्र)

: मार्गदर्शक :

प्रा.डॉ.मनोजकुमार सोमवंशी

एम.ए.बी.एड.,बी.पी.एड.,पीएच.डी.

अर्थशास्त्र विभाग प्रमुख, संशोधन मार्गदर्शक

शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ

ता.शिरुर अनंतपाळ जि.लातूर-413544